6. The highest bidder shall have to deposit 25% of his final bid amount after adjustment of EMD already paid, IMMEDIATELY after being declared as highest bidder (H1). As regards declaration as H1 is concerned, the concerned e-auction agency is directed to send an e- mail (if possible auto-generated) immediately after completion of bid process as per schedule to the H1 that he is the highest bidder advising him to deposit 25% of bid money minus the amount paid as earnest money immediately. For the purpose of this provision, the meaning of word 'immediately' means same day but if bank timing is over, immediately means next bank working day by 4:00 P.M. through RTGS/NEFT in the account as mentioned in sale notice.
7. The successful bidder/auction purchaser shall deposit the balance 75% of sale consideration amount on or before 15th day from the date of the sale of the property. If the 15th day is Sunday or other Holiday, then on immediate first bank working day through RTGS/NEFT in the account as mentioned in sale notice. Further the purchaser shall also be liable to make good of any shortfall or difference between his final bid amount and the price for which it is subsequently sold.
8. The purchaser shall also deposit poundage fee @1% on total sale consideration money (plus Rs. 10) through DD in favour of The Register, DRT-II, Ahmedabad. The DD prepared towards poundage's fees shall be submitted directly with the office of Recovery Officer- II, DRT-II, Ahmedabad. The poundage fee Draft should be separately prepared in favour of 'The Registrar, DRT-II, Ahmedabad' and payment of poundage fee will not be accepted through RTGS/NEFT in any circumstances.
9. In case of default of payment within the prescribed period, the deposit, after deduction of the expenses of the sale, may, if the undersigned thinks fit, be forfeited to the Government Account and the defaulting purchaser shall forfeit all claims to the property or the amount deposited. The property shall be resold forthwith, after the issue of fresh proclamation of sale.
10. The bidder shall give his full name and complete address & state clearly whether he is submitting bid for himself or on behalf of another and in the latter case furnish proper authority (in original) in that regard and the full name and complete address of such party his PAN/TAN Number and photocopy thereof. In case of proper authority, the decision of Recovery Officer taken at the time of confirmation of sale shall be final.
11. The properties shall ordinary be sold in the same order in which they appear in the proclamation.
12. In case of stay of sale or Recovery Proceeding by any superior court of Competent Jurisdiction, the auction may either be postponed/ cancelled in compliance of such order, without any further notice and the persons participating in the sale shall have no right to par claim damages, compensation or cost for such postponement/cancellation etc.
13. The property is sold on "as is where is/on what is" basis, Prospective bidders are advised to peruse/verify copies of title deeds/ documents, if any available with concerned branch of CH Bank and may make, their own inquiries regarding encumbrances, search results and other revenue records relating to the property and shall satisfy themselves regarding the nature and description of property, condition, lien, charges, statutory dues, etc. before submitting the bid.
14. In any circumstances, the property will not be sold below reserve price as specified in the Sale Proclamation/Sale Notice.
15. Anyone of the following documents alone will be accepted as ID proof, viz, (a) Voters ID Card/Aadhar Card (b) PAN CARD; or (c) Ration Card carrying Photo and the name of the bidder(s); or (d) Valid Driving Licence with photo, (e) Passport or (f) any other Government ID carrying the photograph of the bidder(s). The bids be submitted online as per schedule and hard copies of the documents alongwith proof of EMD be submitted to the Recovery Officer-II, DRT-II, Ahmedabad so as to reach on or before the last date of submission of bids.
16. Incomplete/bids without proper EMD, bids not in conformity with the terms and conditions of sale and bids submitted after the stipulated date and time will be summarily rejected.
17. No bidder shall be permitted to withdraw the bid from the auction proceedings after submission of the bid form, till completion of auction.
18. In the event of postponement/cancellation of auction/sale after submission of the bids, on the EMD submitted by the bidders will be returned in their respective accounts for which no interest or charges will be paid.
19. The Particulars of property given in the sale proclamation have been stated to the best of the information of the Recovery Officer thereafter the Recovery Officer shall not be answerable for any error or omission.
20. If for any reason the sale is not confirmed or is set aside, or stayed, the consideration money paid will be refunded to the auction purchaser. The purchaser shall be deemed to have purchased the property with full knowledge and subject to all the reservations/encumbrance, if any.
21. The sale, in normal circumstances, will be confirmed after expiry of 30 days from the date of auction sale, provided full bid amount and poundage fee is deposited as stipulated and there are no objections from any side.
22. No request for inclusion/substitution in the sale certificate of names of any person(s) other than those mentioned in the bid from shall be entertained.
23. All expenses incidental thereto shall be borne by the auction purchaser.
24. The Recovery Officer has the absolute right to accept or reject a bid or to postpone/cancel the notified auction-sale without assigning any reasons.
25. NRI (Non Resident Indian) bidders must necessarily enclose a photo copy of his/her passport and submit their bid duly endorsed by the Indian Embassy/High Commission/Consulate.
26. Sale Certificate will be issued only to the auction purchaser or to the person duly authorised by the auction purchaser, for this purpose after verification of original Identification Card (IDs) and submission of self certified copies of these IDs. In case of authorisation original ID's of both the auction purchaser as well as of the authorised person are mandatory.
27. All terms & conditions mentioned herein above shall be binding to the bidder/auction

SEAL

**Sd/-**
**RECOVERY OFFICER-II**
**DEBTS RECOVERY TRIBUNAL-II , AHMEDABAD**



## भिवंडीत कारला आग

भिवंडी (वार्ताहर) : शहरातील शांतीनगर पिरानी पाडा परिसरातील एका कंपाउंडलगत रस्त्यावर उभ्या असलेल्या कारला अचानक आग लागली. ज्वाळा व धूर निघू लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

# मेट्रोला डिसेंबरचा मुहूर्त

## दहिसर ते काशी मिरा मार्गाची मंत्र्यांकडून पाहणी

भाईंदर, ता. २० (बातमीदार) : दहिसरहून मिरा-भाईंदरच्या हद्दीत येणाऱ्या मेट्रोचा दहिसर ते काशी मिरा हा पहिला टप्पा डिसेंबरअखेर सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या मार्गाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सुरू असलेल्या चाचण्या आता अंतिम टप्प्यात आहेत. डिसेंबरअखेर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते पहिल्या टप्प्याचे लोकार्पण होणार आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी या मार्गाची गुरुवारी (ता. २०) पाहणी केली.

दहिसरपर्यंत आलेली मेट्रो भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत येणार आहे. या मार्गावरील दहिसर ते काशी मिरा या पहिल्या टप्प्याचे काम आता अंतिम टप्प्यात आहे. यावर्षी मे महिन्यात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी मेट्रोच्या कामाची पाहणी केली होती. त्याचवेळी पहिला टप्पा डिसेंबर महिन्यात सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. सध्या मार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने चाचण्या सुरू आहेत. या चाचण्या डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण होणार आहेत. त्यानंतर काही दिवसांतच मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे (सीएमआरएस) प्रमाणपत्र मिळणार आहे. हे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मेट्रो मार्ग सुरू करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे डिसेंबरअखेर या मार्गावर मेट्रो धावण्याची शक्यता आहे. दहिसर ते काशी मिरा हा पहिला टप्पा ४.५ किमी लांबीचा असून, त्यात मुंबईच्या हद्दीतील दहिसर पूर्व व मिरा-भाईंदरच्या हद्दीतील पांडुरंग वाडी, मिरा गाव व काशीगाव अशी चार स्थानके आहेत.

### वसई-विरारहून थेट कुलाबा

हा मार्ग सुरू झाल्यानंतर मिरा-भाईंदरचे प्रवासी मेट्रोने अंधेरीपर्यंत जाऊ शकतील. तसेच अंधेरी येथून मेट्रो १ चा वापर करून विमानतळ स्थानक ३ मधून थेट कुलाबापर्यंतदेखील जाऊ शकणार आहेत. त्यामुळे नवीन वर्षात मिरा-भाईंदरवासीयांसाठी छत्रपती शिवाजी महाराज रेल्वेस्थानक दक्षिण मुंबईतील मंत्रालय, विधान भवन येथे मेट्रोने जाता येणार आहे. मेट्रोचा दुसरा टप्पा काशी मिरा ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान पुढील वर्षी म्हणजे डिसेंबर २०२६ पर्यंत सुरू होणार आहे. त्यासोबतच वसई-विरार मेट्रो मार्गाचे कामदेखील लवकरच सुरू होणार आहे. त्यामुळे वसई-विरारहून थेट कुलाबा असे मेट्रोचे जाळे आगामी काळात विस्तारणार आहे. मेट्रोच्या पहिल्या टप्प्याच्या मार्गाची गुरुवारी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी पाहणी केली. त्यांच्या सोबत महामेट्रोचे अधीक्षक अभियंता, तंत्रज्ञ, सल्लागार आदी उपस्थित होते.



मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर दहिसर ते काशी मिरा या नव्या मेट्रो मार्गाचे डिसेंबरअखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्याचे नियोजन केले जाईल.
**-प्रताप सरनाईक,** परिवहनमंत्री

## फास्ट न्यूज

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

बदलापूर (बातमीदार) : शहरातील एका १५ वर्षांच्या गतिमंद मुलीवर ५५ वर्षांच्या व्यक्तीने अत्याचार केला. मुलगी घरामध्ये एकटी असताना आरोपीने तिच्यावर अत्याचार केला. तसेच तिला जीवे मारण्याची धमकी दिली. आई घरी आली असता ती आईशी बोलत नव्हती. आईने तिला विश्वासात घेतल्यानंतर तिने घडलेला प्रकार सांगितला. याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

### ठाण्यात पुजाऱ्याची पुजाऱ्याला मारहाण

ठाणे : एका पुजाऱ्याने दुसऱ्या पुजाऱ्याला मारहाण केली. याप्रकरणी सात जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून, एका मंदिरात निरंजन कदम गेले होते. त्या वेळी सुनील मिरगुडे, रोहन नेटके, मनोज नेटके, अथर्व सानप, रोहिदास वाढवले आणि दोन अनोळखी व्यक्तींनी कदम यांना मारहाण केली.

# कॉल सेंटरवर कारवाई

## नवी मुंबईतील छाप्यात २० जणांना अटक

नवी मुंबई, ता. २० (वार्ताहर) : नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलने महापे येथील मिलेनियम बिझनेस पार्कमध्ये सुरू असलेले बनावट कॉल सेंटर उद्ध्वस्त केले आहे. तसेच शेअर मार्केट ट्रेडिंगमधून जास्तीचा नफा मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळीतील २० जणांना अटक केली आहे.

या छाप्यात जप्त केलेल्या संगणकांच्या तपासणीत फसवणुकीसाठी ७१ बँक खात्यांचा वापर करण्यात आल्याचे आढळले आहे. त्यापैकी ६१ खात्यांतून १२.२९ कोटींचा आर्थिक व्यवहार झाल्याचे उघडकीस आले आहे. या कारवाईमुळे देशभरातील सायबर क्राइम पोर्टलवरील ३१ तक्रारी उघडकीस आल्या आहेत.

मिलेनियम बिझनेस पार्क मधील बिल्डिंग नं.३ मध्ये तिसऱ्या मजल्यावरील कॉल सेंटरवर छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी एकूण २० जणांना अटक केली आहे. त्यातील तीन तरुणींना नोटीस देऊन त्यांची सुटका करण्यात आली.

### मालवेअर अटॅक



या रॅकेटचा सर्वात धक्कादायक भाग म्हणजे रात्रीच्या वेळी ही टोळी आय. टी. मॅक वर्ड सोल्युशन या नावाखाली अमेरिकन नागरिकांच्या संगणकांवर मालवेअर अटॅक करत होते. त्यानंतर त्यांच्या स्क्रीनवर मायक्रोसॉफ्ट एरर कोड असा संदेश आणि कस्टमर सपोर्ट नंबर दाखवला जायचा, तो प्रत्यक्षात कॉल सेंटरमधील व्हीओआयपी नंबर असायचा. अमेरिकन पीडित व्यक्ती मदतीच्या शोधात त्या नंबरवर कॉल करताच कॉल सेंटरमधील कर्मचारी मायक्रोसॉफ्टचे इंजिनिअर असल्याचे भासवून त्यांच्याकडून डॉलर्समध्ये शुल्क उकळत होते. या कॉल सेंटरमध्ये प्रत्येक कर्मचाऱ्याला नागरिकांशी कसे बोलायचे यासाठी स्क्रिप्ट तयार करून देण्यात आल्याचे तपासात उघडकीस आले आहे

### मोठी जप्ती

कारवाईदरम्यान पोलिसांनी २१ सीपीयू, पाच लॅपटॉप, पाच एसएसडी, एक जी एस सर्व्हर, ३८ मोबाईल फोन जप्त केले आहेत. तसेच १०८ संगणकांमधील महत्त्वाचा डिजिटल पुरावा सुरक्षित करण्यात आला आहे. या कारवाईत, द वेल्थ ग्रोथ, द कॅपिटल सर्व्हिसेस, सिग्मा, ट्रेड नॉलेज सर्व्हिसेस आणि स्टॉक व्हिजन अशा नावाखाली चालणाऱ्या पाच बोगस कंपन्यांमध्ये १७ तरुण-तरुणी शेअर मार्केटमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवत नागरिकांना जाळ्यात ओढत असल्याचे उघड झाले.

# भारतीय मच्छीमाराचा पाकिस्तानमध्ये मृत्यू

पालघर, ता. २० : मासेमारी करताना चुकून पाकिस्तान हद्द ओलांडल्याने पाकिस्तानच्या सुरक्षा यंत्रणांनी एका भारतीय मच्छीमाराला कैद केले होते. त्याचा कराची तुरुंगात मंगळवारी मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. याआधीही एका मच्छीमाराचा तेथे मृत्यू झाला होता. आतापर्यंत पाकिस्तानच्या तुरुंगामध्ये एकूण १९९ भारतीय मच्छीमार कैद आहेत. त्यातील महाराष्ट्राच्या पालघरमधील १९ मच्छीमार खलाशी आहेत.

पाकिस्तान तुरुंगात मृत्यू झालेल्या या मच्छीमाराच्या मृत्यूची माहिती पाकिस्तान इंडिया डेमोक्रेसी पीपल फोरमचे माजी पदाधिकारी आणि शांततावादी कार्यकर्ते जतीन देसाई यांनी दिली आहे. मच्छीमारचे नाव अजूनही पुढे आलेले नाही. मृत्यू झालेल्या मच्छीमाराचे भारतीयत्व सिद्ध झाले होते. त्याची शिक्षा दोन वर्षांपूर्वी पूर्ण झाली होती. दोन्ही देशातील २००८ च्या कॉन्स्युलर एक्सेस कराराप्रमाणे या मच्छीमाराला खूप आधी सोडणे गरजेचे होते, मात्र त्याची सुटका झाली नव्हती.

# नवी मुंबईत अमली पदार्थ जप्त

## कोपरी गावातील छाप्यात पोलिसांकडून एकाला अटक

नवी मुंबई, ता. २० (वार्ताहर) : अमली पदार्थ विरोधी पथकाने वाशीतील कोपरी गाव येथे छापा टाकून तब्बल एक कोटी ३५ लाख ९० हजार रुपये किमतीचे २७१.८ ग्रॅम हेराईन जप्त केले आहे. या कारवाईत एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. त्याला पंजाब येथून अमली पदार्थाचा पुरवठा होत असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे अमली पदार्थाचे पंजाब कनेक्शन उघड झाले आहे.

### पंजाबचे ‘सप्लाय नेटवर्क’



अमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप निगडे यांनी बुधवारी (ता. १९) कोपरीगावात छापा टाकला. या वेळी आरोपी विक्रमजितसिंग अमरीकसिंग (३४), मूळ रहिवासी अमृतसर (पंजाब) हा वाशीतील परशुराम पाटील बिल्डिंगमध्ये भाड्याने राहात असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या खोलीत विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आलेले तब्बल १.३५ हेरॉईन आढळले. तपासात तो पंजाबमधून मोठ्या प्रमाणात माल मागवून नवी मुंबईतील ओळखीच्या व्यक्तीमार्फत विक्री करत असल्याचे उघडकीस आले आहे.

# ‘नाईक यांनी पुढाकार घ्यावा’

वाशी, ता. २० (बातमीदार) : आगामी नवी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमध्ये माजी आमदार संदीप नाईक यांनी उमेदवार उभे करण्यासाठी पुढाकार घावा. आपण त्यांचे स्वागतच करू, असे स्पष्ट संकेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिले आहेत.

संदीप नाईक यांच्या भाजप प्रवेशाच्या सतत चर्चा सुरू असतात. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने संदीप नाईक यांच्या नेतृत्वाचा पालिका निवडणुकीमध्ये उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने पुन्हा एकदा त्यांना आवाहन केले आहे. विधानसभा निवडणुकीत संदीप नाईक यांच्या प्रवेशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नवी मुंबईमध्ये मोठी ताकद मिळाली होती.

# पतीच्या हत्येप्रकरणी पत्नी, मुलांना अटक

भाईंदर, ता. २० (बातमीदार) : भाईंदर पूर्व येथे झालेल्या सुवर्णकाराच्या हत्येचे गूढ नवघर पोलिसांनी उकलले आहे. सुवर्णकाराच्या पत्नी आणि मुलांनीच पैशांवरून ही हत्या केल्याचे उघड झाले आहे. पोलिसांनी आरोपींना अटक केली असून त्यात एका अल्पवयीन मुलाचा समावेश आहे.

# अंबरनाथमध्ये कंपन्यांवर कारवाई

## प्रदूषणप्रकरणी १३ कंपन्यांना नियंत्रण मंडळाचे आदेश

अंबरनाथ, ता. २० (वार्ताहर) : काही दिवसांपूर्वी शहरातील भीमनगर, एम.पी. गेट, निसर्ग ग्रीन, पाठारे पार्क, तसेच पश्चिम परिसरात विषारी वायूचे लोट पसरल्याने नागरिकांना श्वास घेणे मुश्कील झाले होते. या गंभीर घटनेनंतर नागरिकांमध्ये तीव्र संताप होता. याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १३ कंपन्या तत्काळ बंद करण्याचे आदेश कंपनी मालक आणि प्रशासनाला दिले आहेत.

काही दिवसांपूर्वी शिवसेनेचे माजी नगरसेवक निखिल वाळेकर यांनी निसर्ग ग्रीन, पाठारे पार्क, ग्रीन सिटी परिसरातील नागरिकांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत कारखानदार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, नगरपालिका आणि अग्निशमन दल अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर प्रदूषणाच्या मुद्द्यावर राज्य शासनाकडे दाद मागण्यात आली होती.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून काही कंपन्या सील करण्यात आल्या. तर अनेकांना कारणे दाखवा नोटीस दिल्या होत्या. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी जयंत कदम यांनी सांगितले, की याप्रकरणी मोरीवली एमआयडीसी आणि चिखलोली एमआयडीसी परिसरातील एकूण १३ कंपन्या तत्काळ बंद करण्याचे आदेश कंपनी मालक आणि प्रशासनाला देण्यात आले आहेत.

मोरीवली एमआयडीसीतील सोलार केमिकल्स, नॅशनल केमिकल इंडस्ट्री, सीताराम केमिकल्स, निका केम प्रॉडक्ट्स आदींचा समावेश आहे.

### सातत्य हवे

गेल्या १० वर्षांपासून प्रदूषणविरोधात लढणारे सामाजिक कार्यकर्ते शशिकांत दायमा यांनी मोरीवली एमआयडीसी (अंबरनाथ पश्चिम) परिसरातून सर्वाधिक वायू प्रदूषण होत असल्याचा दावा केला. तसेच झालेल्या कारवाईचे त्यांनी स्वागत केले. सातत्याने कारवाई झाल्यास प्रदूषणाची समस्या निर्माण होणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# ‘त्या’ वैद्यकीय अधिकाऱ्यांवर अखेर कारवाई

पालघर, ता. २० (बातमीदार) : प्राथमिक आरोग्य केंद्र अशागड तालुका डहाणू येथे वैद्यकीय अधिकारी कामावर उपस्थित नव्हते. याची गंभीर दखल घेत, त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांच्या निर्देशानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी चौकशी समिती स्थापन केली होती.

या चौकशी समितीच्या अहवालानुसार सर्व कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी एकही अधिकारी घटनेच्यावेळी हजर नव्हते. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात आली आहे. तसेच कंत्राटी वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली मालवणकर व डॉ. कृतिका जनाठे यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे, तर नियमित वैद्यकीय अधिकारी डॉ. क्षितिजा पाटील यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचा कार्यभार अन्य वैद्यकिय अधिकाऱ्यांकडे देण्यात आल्याचे जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले.

• APPOINTMENT • JOB •

WE’RE HIRING

JOIN OUR TEAM

D. Y. Patil Group, Kolhapur, a leading Business Group having it's spread across various businesses such as Hospitality, Retail, Wellness, Infra, Health Care, Education, Agriculture etc, provides you an exciting opportunity to upscale your career. Thus invites application for following positions.

**SPORTS INCHARGE** — 01
**Educational Qualification:** Bachelor’s/Master’s in Physical Education or Sports Management.
**Experience:** Min. 5 yrs. in training, maintaining sports infrastructure and facilities & organizing sports events.

**TRANSPORT INCHARGE** — 01
**Educational Qualification:** Graduate/Diploma in Automobile/Machanical Engg.
**Experience:** Min. 5 yrs. in managing transport operations & management.

**CAMPUS INCHARGE** — 01
**Educational Qualification:** Graduate/Post Graduate.
**Experience:** Ex. Army officers preferred.

**LANDSCAPE DESIGNER** — 01
**Educational Qualification:** Bachelor’s/Master’s degree in Agriculture/Landscape Architecture or a related field.
**Experience:** Min. 3 yrs. experience in landscape planning and design, Layouts, Plant selection is preferred.

DYP D Y PATIL GROUP

Salary will not be a constraint for the right candidate.
Please email your resume at
**hrcorporate@dypgroup.org**
before 30th of November 2025.

## John Cockerill — जॉन कॉकरिल इंडिया लिमिटेड

CIN.: L99999MH1986PLC039921

**नोंदणीकृत कार्यालय :** १९०२, १९ वा मजला, ऑरम क्यू2 आयटी पार्क, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१०
**दूरध्वनी क्र.:** +९१ ९६१९७६२७२७ **ईमेल:** investors.jcil@johncockerill.com
**वेबसाइट:** www.johncockerillindia.com

**पोस्टल बॅलेट नोटिस आणि ई-व्होटिंगविषयक माहिती**

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ **("कायदा")** च्या कलम ११०, १०८ आणि इतर लागू तरतुदी, जर असतील तर, त्यानुसार, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ **("नियम")**, भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड **("सेबी")** (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स अँड डिसक्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ **("लिस्टिंग रेग्युलेशन्स")**च्या नियम २० आणि नियम २२ सह वाचलेले, सेबीच्या संबंधित परिपत्रकांसह वाचलेले, द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया **("एसएस-२")** द्वारे जारी केलेल्या जनरल मीटिंग्जवरील सेक्रेटरीअल स्टँडर्डसह वाचलेले आणि इतर लागू कायदे, नियम आणि नियमांच्या अधीन राहून (सध्या अंमलात असलेले कोणतेही वैधानिक बदल, पुनर्अधिनियम, स्पष्टीकरण किंवा बदली) आणि सर्वसामान्य परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ०८ एप्रिल २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, २२/२०२० दिनांक १५ जून २०२०, ३३/२०२० दिनांक २८ सप्टेंबर २०२०, ३९/२०२० दिनांक ३१ डिसेंबर २०२०, १०/२०२१ दिनांक २३ जून २०२१, २०/२०२१ दिनांक ०८ डिसेंबर २०२१, ०३/२०२२ दिनांक ०५ मे २०२२, ११/२०२२ दिनांक २८ डिसेंबर २०२२, ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर २०२३, ०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर २०२४ आणि ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या इतर संबंधित परिपत्रकांसह वाचले जाणारे ठराव **("एमसीए")** (एकत्रितपणे **"एमसीए परिपत्रके"** म्हणून ओळखले जाते) खाली जोडलेले ठराव जॉन कॉकरिल इंडिया लिमिटेड **("कंपनी")** यांच्या सदस्यांच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहेत की जेणे करून सदस्यांद्वारे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करून **("रिमोट ई-व्होटिंग")** फक्त पोस्टल बॅलटद्वारे सामान्य आणि विशेष ठराव मंजूर केले जावेत.

| अ.क्र. | ठरावाचा प्रकार | ठरावाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | विशेष | कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १८६ अंतर्गत गुंतवणुकीसाठी, कर्जे प्रदान करण्यासाठी, हमी देण्यासाठी आणि सुरक्षा देण्यासाठी आवश्यक मर्यादा मंजूर करणे. |
| २. | सामान्य | बेल्जियममधील जॉन कॉकरिल मेटल्स इंटरनॅशनल एसएच्या शेअर्सच्या संपादनासाठी मूळ कंपनी जॉन कॉकरिल एसए सोबत मटेरियल रिलेटेड पार्टी ट्रान्झॅक्शनला मंजुरी देणे. |
| ३. | विशेष | कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १८०(१)(क) अंतर्गत कंपनीच्या कर्ज घेण्याच्या मर्यादेत वाढ करण्यास मान्यता देणे. |
| ४ | विशेष | कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १८०(१)(अ) अंतर्गत कंपनीच्या मालमत्तेवर गहाणखत/शुल्क निर्माण करण्याचा विचार करणे आणि मंजूर करणे. |

पोस्टल बॅलेट नोटिस कंपनीच्या वेबसाइटवर (www.johncockerillindia.com), नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("NSDL") (www.evoting.nsdl.com) आणि BSE लिमिटेड ("BSE") (www.bseindia.com) वर उपलब्ध आहे, जेथे कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत.

एमसीए परिपत्रकांनुसार, कंपनीने गुरुवार, २० नोव्हेंबर २०२५ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पोस्टल मतदान सूचना अशा सदस्यांना पाठवली आहे ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी / डिपॉझिटरीज किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट **("आरटीए")** - बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे नोंदणीकृत आहेत आणि ज्यांची नावे कंपनीच्या सदस्यांच्या नोंदणीमध्ये (रजिस्टर ऑफ मेंबर्स)/ शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५ रोजी **("कट-ऑफ तारीख")** डिपॉझिटरीजद्वारे राखलेल्या लाभार्थी मालकांच्या यादीत नोंदवलेली आहेत.

कंपनीने तिच्या सदस्यांना रिमोट ई-व्होटिंग सुविधा प्रदान करण्यासाठी एनएसडीएलच्या सेवा नियुक्त केल्या आहेत. रिमोट ई-व्होटिंग कालावधी शुक्रवार, २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता (IST) पासून सुरू होईल आणि हा कालावधी शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता (IST) संपेल. त्यानंतर एनएसडीएल ई-व्होटिंग मॉड्यूल बंद करेल. सदस्यांचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ तारखेला कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटलमध्ये त्यांच्याकडे असलेल्या शेअर्सच्या प्रमाणात असतील. सदस्यांच्या संमती किंवा असहमतीचे संदेशन (कम्युनिकेशन) फक्त रिमोट ई-व्होटिंग सिस्टमद्वारेच केले जाईल. कट-ऑफ तारखेला ज्या सदस्यांची नावे कंपनीच्या सदस्यांच्या नोंदणीमध्ये / डिपॉझिटरीजद्वारे राखलेल्या लाभार्थी मालकांच्या यादीत नोंदवली गेली आहेत त्यांनाच रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याचा अधिकार असेल. एकदा सदस्याने ठरावावर मतदान केले की, त्याला/तिला नंतर त्यात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांनी पोस्टल मतदान सूचना प्राप्त करण्यासाठी शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता (IST) किंवा त्यापूर्वी **https://www.bigshareonline.com/InvestorRegistration.aspx** या लिंकवर क्लिक करून नोंदणी करावी आणि त्यातील मार्गदर्शनानुसार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी.

ई-व्होटिंगशी संबंधित तपशीलांसाठी, कृपया पोस्टल बॅलट नोटिस पहा. कोणत्याही प्रश्नांच्या बाबतीत, तुम्ही www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेल्या शेअरहोल्डर्ससाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि शेअरहोल्डर्ससाठी ई-व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका (ई-व्होटिंग यूझर मॅन्युअल) पाहू शकता किंवा टोल फ्री क्रमांक: 022-4886 7000 वर कॉल करू शकता किंवा evoting@nsdl.com वर वरिष्ठ व्यवस्थापक श्री. सागर एस. गुधाते यांना विनंती (रिक्वेस्ट) पाठवू शकता.

मंगळवार, ४ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत, रिमोट ई-व्होटिंग प्रक्रियेद्वारे पोस्टल मतदान निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने आयोजित करण्यासाठी, मेसर्स व्हीकेएम अँड असोसिएट्स, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीजचे श्री विजय कुमार मिश्रा (सीपी क्रमांक ४२७९) यांची छाननीकर्ता (स्क्रुटिनायझर) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

पोस्टल बॅलटचे निकाल मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता (IST) किंवा त्यापूर्वी जाहीर केले जातील. स्क्रूटिनायझरच्या अहवालासह हे निकाल BSE ला कळवले जातील. तसेच हे निकाल कंपनीच्या www.johncockerillindia.com या वेबसाइटवर आणि NSDL च्या www.evoting.nsdl.com या वेबसाइटवर देखील अपलोड केले जातील.

**जॉन कॉकरिल इंडिया लिमिटेड यांच्यासाठी**
**सही/-**
**फ्रेडरिक रेने मार्टिन**
**व्यवस्थापकीय संचालक**
**DIN: 11210964**

**तारीख : २० नोव्हेंबर २०२५**
**ठिकाण : नवी मुंबई**

## लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड

CIN: L24200MH1989PLC051736,
नोंदणीकृत कार्यालय: ए-२२/२/३, एमआयडीसी महाड, रायगड ४०२ ३०९ भारत | दूरध्वनी: +९१-२२-४९१०४४४४, फॅक्स: +९१-२२-२२८५३७५२
ईमेल: investors@laxmi.com, वेबसाइट: www.laxmi.com

### अर्ज पीएएस-१

**[कंपन्या (प्रॉस्पेक्टस अँड अॅलोटमेंट ऑफ सिक्युरिटीज) अधिनियम २०१४ च्या कलम २७(१) आणि नियम ७(२) नुसार]**
**ज्या उद्देशांसाठी प्लेसमेंट दस्तऐवज जारी करण्यात आला होता त्यामध्ये बदल/सुधारणा करण्यासाठी आवश्यक विशेष ठरावाची तपशीलवार सूचना देणारी जाहिरात**

**कंपनी तपशील**

कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN) : **L24200MH1989PLC051736**
कंपनीचे नाव : **लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : **ए-२२/२/३, एमआयडीसी, महाड, महाराष्ट्र, भारत ४०२ ३०९**

याद्वारे सूचना देण्यात येते की, २९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या ठरावाद्वारे बोर्डाने (संचालक मंडळाने) **१० ऑक्टोबर २०२३** रोजीच्या प्लेसमेंट डॉक्युमेंटमध्ये नमूद केल्याप्रमाणे **("प्लेसमेंट डॉक्युमेंट")**. क्वालिफाइड इन्स्टिट्यूशनल प्लेसमेंट (QIP) इश्यूच्या उद्दिष्टांच्या अटींमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने, पुढील सूचना देण्यात येत आहे की सदर प्रस्तावाला मान्यता देताना, पोस्टल मतपत्रिकेद्वारे एक विशेष ठराव मंजूर करण्यात येईल.

**अशा बदल/सुधारणेची माहिती खालीलप्रमाणे आहे :**

प्लेसमेंट डॉक्युमेंटमध्ये आणि स्टॉक एक्सचेंजमध्ये दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये उघड केल्याप्रमाणे, उत्पन्नाच्या हेतूचा उपयोग खालीलप्रमाणे होता :

**१. बदल/सुधारणा करावयाच्या कराराच्या अटींचे तपशील**

| अ. क्र. | प्लेसमेंट डॉक्युमेंटनुसार हेतू | (₹ Mn) रु. दशलक्षामध्ये) |
|---|---|---|
| i) | महापे, एमआयडीसी ("महापे") येथे नवीन इनोव्हेशन सेंटर स्थापन करण्यासाठी आवश्यक भांडवली खर्च निधी | ३६०.०१ |
| ii) | गुजरातमधील भरूच ("दहेज") येथे नवीन उत्पादन सुविधा उभारण्यासाठी भांडवली खर्च निधी | १,६१९.६६ |
| iii) | सामान्य कॉर्पोरेट उद्देश | ५०६.०५ |
| iv) | ऑफर संबंधित खर्च | १०५.४९ |
| | एकूण | २,५९१.२१ |

**२. प्रस्तावित बदल/सुधारणेचा तपशील**

महापे प्रकल्पात झालेल्या खर्चात बचत आणि त्याच्या एकूण प्रकल्प खर्चाच्या पूर्णतेमुळे, ₹१०९.५८ दशलक्ष (मिलियन) इतका न वापरलेला निधी शिल्लक आहे, जो पुनर्वाटपासाठी उपलब्ध आहे. हा न वापरलेला निधीचा हिस्सा दहेज प्रकल्पासाठी पुन्हा वाटप करण्याचा प्रस्ताव आहे, जिथे अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | तपशील | मूलतः नियोजित | ३०/०९/२०२५ पर्यंत वापराविना | प्रस्तावित बदल | उत्पन्नाचा सुधारित वापर |
|---|---|---|---|---|---|
| I) | महापे, एमआयडीसी ("महापे") येथे नवीन इनोव्हेशन सेंटर स्थापन करण्यासाठी भांडवली खर्च निधी. | ३६०.०१ | १०९.५८ | **(१०९.५८)** महापे प्रकल्पाच्या वापरात नसलेल्या निधी हिश्शाचे दहेज प्रकल्पासाठी पुनर्वाटप | २५०.४३ |
| ii) | गुजरातमधील भरूच ("दहेज") येथे नवीन उत्पादन सुविधा उभारण्यासाठी भांडवली खर्च निधी | १,६१९.६६ | २३६.२८ | १०९.५८ | १,७२९.२४ |
| iii) | सामान्य कॉर्पोरेट उद्देश | ५०६.०५ | - | - | ५०६.०५ |
| iv) | ऑफर संबंधित खर्च | १०५.४९ | - | - | १०५.४९ |
| | एकूण | २,५९१.२१ | ३४५.८६ | - | २,५९१.२१ |

**३. उद्दिष्टामध्ये सुधारणा आणि बदलाचे कारण :**

- महापे प्रकल्प मूळ बजेटपेक्षा कमी खर्चात पूर्ण झाला आहे, ज्यामुळे एक न वापरलेला अधिशेष शिल्लक असणे.
- न वापरलेले महापे शिल्लक दहेज प्रकल्पाला पुन्हा वाटप केल्याने निधीचा इष्टतम वापर सुनिश्चित होतो.
- प्लेसमेंट डॉक्युमेंटच्या अटी मंडळाला उत्पन्नाच्या वापरातील न वापरलेले हिस्सा पुन्हा वाटप करण्याची लवचिकता प्रदान करतात.
- दहेज प्रकल्पाची वेळ वाढवल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणी वेळापत्रकानुसार निधीच्या कार्यक्षम आणि टप्प्याटप्प्याने विनियोगासाठी पुरेसा वेळ मिळतो.

**४. उद्दिष्टांमध्ये सुधारणा/बदलाचे औचित्य**

कंपनीच्या वाढीच्या योजनांना पाठिंबा देताना, QIP उत्पन्नाचा इष्टतम वापर सुनिश्चित करण्यासाठी, प्रकल्प अंमलबजावणीला गती देण्यासाठी आणि सदस्यांसाठी दीर्घकालीन परतावा जास्तीत जास्त देण्यासाठी खाली नमूद केलेल्या उद्दिष्टांसाठी न वापरलेली रक्कम पुन्हा वाटप करणे हे मंडळाला अधिक शहाणपणाचे वाटते. या बदलामुळे कोणताही नवीन उद्देश सादर होत नाही आणि QIP च्या वेळी उघड केलेल्या व्याप्तीमध्येच तो राहतो.

**५. नवीन उद्दिष्टांसाठी वापरण्यासाठी प्रस्तावित रक्कम**

कोणतीही नवीन उद्दिष्टे प्रस्ताव नाहीत. कंपनी फक्त₹ १०९.५८ दशलक्ष (महापे प्रकल्पाचा न वापरलेला निधी हिस्सा) दहेज प्रकल्पासाठी पुन्हा वाटप करण्याचा प्रयत्न करते, जो आधीच QIP प्रकल्पांचा भाग आहे.

**६. विविध उद्दिष्टांच्या वापरासाठी सुधारित वेळापत्रक**

दहेज प्रकल्पासाठी वाटप केलेल्या रकमेच्या वापराच्या वेळेत सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. प्लेसमेंट डॉक्युमेंटमध्ये उघड केलेल्या वेळेच्या जागी, आता ही रक्कम ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वापरली जाईल.

**७. कमाई आणि रोख प्रवाहावर अंदाजे आर्थिक परिणाम**

न वापरलेल्या उत्पन्नाच्या वापरानंतर, कंपनीला दीर्घकालीन कमाई आणि कार्यरत रोख प्रवाहात (ऑपरेटिंग कॅश फ्लो) सुधारणा अपेक्षित आहे, जे आधीच्या कमिशनिंग/रॅम्प-अप आणि चांगल्या मालमत्तेच्या वापरामुळे चालते. तरलता (लिक्विडिटी) किंवा लीव्हरेजवर कोणताही प्रतिकूल परिणाम अपेक्षित नाही आणि उत्पन्नाच्या लेखा प्रक्रियेत कोणताही बदल नाही. प्रस्तावित बदल QIP उत्पन्नाचे इष्टतम वितरण आणि वाढीव मूल्य निर्मिती सुनिश्चित करतो.

***सूचना/ठरावाची उपलब्धता**

नोटीस आणि ठरावाची प्रत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून कामकाजाच्या वेळेत मोफत मिळू शकते आणि ती कंपनीच्या www.laxmi.com या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.

**८. विविध उद्दिष्टांशी संबंधित जोखीम घटक**

प्रस्तावित बदलामध्ये कोणताही नवीन उद्देश समाविष्ट नाही आणि त्यामुळे कंपनीच्या जोखीम प्रोफाइलमध्ये लक्षणीय बदल होत नाही. अंमलबजावणी, नियामक/परवानगी, पुरवठा-साखळी आणि खर्च-वाढीचे धोके यासारखे नेहमीचे प्रकल्प धोके लागू राहतात आणि विद्यमान नियंत्रणांनुसार ते व्यवस्थापित केले जातील. या पुनर्वाटपातून कोणतेही अतिरिक्त जोखीम घटकांची कल्पना केलेले नाहीत.

त्यानुसार, प्लेसमेंट डॉक्युमेंटमध्ये उघड केल्याप्रमाणे इश्यूच्या उद्दिष्टांच्या अटींमध्ये बदल करण्यासाठी कंपनी पोस्टल मतपत्रिकेद्वारे विशेष ठरावाद्वारे सदस्यांची मान्यता मागते आहे.

कंपनीतील त्यांच्या शेअरहोल्डिंगच्या मर्यादेशिवाय, जर काही असेल तर, संचालक, प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक या ठरावांमध्ये आर्थिकरित्या किंवा अन्यप्रकारे संबंधित नाहीत किंवा त्यांचे कोणतेही स्वारस्य (इंटरेस्टेड)नाही.

**लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्यासाठी**
सही/-
**अनिकेत हिरपारा**
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
**तारीख :** ०६ नोव्हेंबर २०२५, **ठिकाण :** मुंबई